FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

0154167

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला. प्र. वि., पहिली खबर क्र. FIR No. ६, वर्ष Year 2022, दिनांक Date 03/03/2022
2. (i) अधिनियम Act ........., कलमे Sections .........
   (ii) अधिनियम Act भ्र. प्र. अधि. १९८८, कलमे Sections ७
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections .........
3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day बुधवार, तारीख पासून Date from 2/03/2022, वेळ Time १६.४५, तारीख पर्यंत Date to 3/3/2022, वेळ Time १५.३०

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खुण करा) (Tick applicable portion).

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 03/03/2022, वेळ Time १६.४५
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 02/2022, तारीख Date 3/03/2022, वेळ Time १८.३० वा.
4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral .........
5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यांपासून अंतर व दिशा ........., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. .........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name साईकृपा झेरॉक्स, ठिकाणाचे नंबर No. if any सेंटर, गल्ली Ward बाजूच्या फुटपाथवर, रस्त्याचे नाव Name of road सरदार पोचखानवाला रोड

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place वरळी पोलीस कॅम्प, गाव Village ........., पोस्ट Post मुंबई ३०, तालुका Taluka ........., जिल्हा Dist. ........., राज्य State .........

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ........., तालुका Taluka ........., जिल्हा Dist. ........., राज्य State .........
6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name यशवर्धन आबाजी तुपविरे
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name आबाजी तुपविरे
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ५६ वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. 8322306066
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........., दिल्याचा दिनांक Date of Issue ........., दिल्याचे ठिकाण Place of Issue ........., (f) व्यवसाय Occupation नोकरी
   (g) धर्म Religion ........., जात Caste ........., जनजात Sub-Caste .........
   (h) पत्ता Address : निर्मलनगर, गल्ली / सर्व्हे नं. Ward ........., घर / नाव नं. House/Name No. ........., फोन / मो. नं. Phone/Mo. No. ........., पॅन नं. PAN No. ........., वोटर्स नं. Card No. .........

   रस्त्याचे नाव Road ........., जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........., गाव Village ........., पोस्ट Post ........., पो. स्टे. P. Stn. .........

   तालुका Taluka ........., जिल्हा Dist. ........., राज्य State ........., सध्याचा पत्ता Present Address .........
7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   सचिन आत्माराम नडे, वय ४२ वर्षे, पद- वरिष्ठ लिपिक, रस्ते व वाहतूक मुख्यालय, वरळी पोलीस कॅम्प. मुंबई ३०

   पत्ता- P. W. D. ५४१३, बी डी डी चाळ ४९ ... महात्मा ज्योतिबा फुले मार्ग. नायगाव मुंबई १४



Scanned with CamScanner

यातील फिर्यादी श्री. यशवंतदीन आबाजी कुंभवरे.
राहि: विजयनगर e सी को. ऑ. हौ. सोसायटी, रुम नं
४०१, एस. पी. गुजर मार्ग, गवाणपाडा, मुलुंड (पु) मुंबई
यांनी दिलेला फिर्यादी जबाब स्वतंत्र कागदावर घेण्यात
टंकलिखित केला असून त्या गुन्ह्याचा पहिली खबर
संबोधण्यात येत आहे.

समक्ष

08/03/2021

(अनिल शिंदे)
पोलीस निरीक्षक.
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग.
मुंबई

3/3/2021

Scanned with CamScanner

फिर्याद

दि. ०३/०३/२०२१

श्री. यशवर्धन आबाजी सुर्यवंशी, वय ५६ वर्षे, धंदा– पोलीस हवालदार क्र. ६८१३, नेमणुक– वाहतुक प्रशिक्षण संस्था, भायखळा, मुंबई रा.ठि. बिल्डिंग नं. ९/सी, निलम नगर को.ऑ.हौ.सोसायटी, रूम. न. ४०१, चौथा माळा, एस.बी. गुजर मार्ग, गवाणपाडा, मुलूंड पुर्व, मुंबई – ४०००८१.
मोबाईल नंबर – ९८२१६९४०१३/ ९३२२४००७७८.

.........

मी वरिलप्रमाणे असून वर नमुद पत्यावर माझे कुटुबियांसह मागील २१ वर्षापासुन वास्तव्यास आहे. मी दिनांक १५/०९/१९८९ रोजी मुंबई पोलीस दलात पोलीस शिपाई म्हणून नियुक्त झालो आहे. मी मागिल चार व र्षापासून वाहतुक प्रशिक्षण संस्था, भायखळा, मुंबई येथे नेमणूकीस आहे. सदर संस्थेत मी रोड साईन अॅन्ड रोड मार्कींग , पोलीस जनता संवाद कसा असावा तसेच वार्डन यांना वाहतुक विषयी प्रशिक्षण देतो.

मी दिनांक ३१/०७/२०१८ रोजी माझे कर्तव्य संपवून घरी जात असताना मला अस्वस्थ वाटू लागल्याने पोलीस रूग्णालय नागपाडा येथे औषधोपचारकामी गेलो असता तेथील डॉक्टरांनी मला दुसरे दिवशी तपासणीकामी बोलाविले. त्यानुसार मी दिनांक ०१/०८/२०१८ रोजी पोलीस रूग्णालय नागपाडा येथे गेलो असता तेथील डॉक्टरांनी मला तपासून बाहयरूग्ण म्हणून माझेवर उच्च रक्तदाब व मधुमेह यावर औषधोपचार सुरू केले. उपचारा दरम्यान माझी मनस्थिती ठिक नसल्याचे डॉक्टरांना आढळून आल्याने मनोरूग्ण तज्ञांचा सल्ला घेण्यास सांगितले. त्यानुसार मी दिनांक १४/०९/२०१८ ते ०१/०६/२०१९ या दरम्यान मनोरूग्णालय जि. ठाणे येथे उपचार घेतले. सदर उपचार सुरू असताना मी मोटार सायकलवरून पडल्याने माझे डोक्यास मुका मार लागला होता. त्यामुळे मला फोर्टीस हॉस्पिटल, मुलुंड पश्चिम येथे औषधोपचाराकरिता दाखल केले असता तेथे माझे सीटी स्कॅन करण्यात येवून दोन दिवसांनी घरी सोडण्यात आले होते. घरी गेल्यानंतर वारंवार माझे डोके दुखु लागल्यामुळे मी पोलीस शल्य चिकित्सक, पोलीस रुग्णालय, नागपाडा, मुंबई यांच्या सल्याने एम.आर.आय. करण्याकरीता मॅग्नम डायग्नोसिस सेंन्टर येथे तपासणीसाठी गेलो. तेथे तपासणी केल्यानंतर माझी परिस्थिती फार गंभीर असून माझेवर शस्त्रक्रियेची अत्यंत आवश्यकता असल्याचे डॉक्टरांच्या लक्षात आले. त्यामुळे मला उपचारासाठी पुन्हा फोर्टीस रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे माझ्या वर तीन वेळा शस्त्रक्रिया करण्यात आल्या. मेंदुवर शस्त्रक्रिया केल्यामुळे मला अत्यंत शारिरीक थकवा जाणवु लागला. रुगणालयातुन रुग्णमुक्त केल्यानंतर तिसऱ्या दिवशी मला फिट आल्यामुळे पुन्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी पाच तास निगराणी खाली ठेवून मला घरी सोडले. त्यानंतर माझ्यावर डॉक्टरांच्या सल्याने घरीच औ  ाधोपचार सुरू करण्यात आले होते व अद्याप सुरू आहे.

माझी तब्येत बरी झाल्यानंतर मी दिनांक १९/११/२०१९ रोजी माझ्यावर वेळोवेळी करण्यात आलेले उपचार व शस्त्रक्रिये संदर्भातील सर्व कागदपत्रे व कर्तव्यावर हजर होणेकरीता नागपाडा रूग्णालयचे स्वास्थ प्रमाणपत्र घेवून मा. अपर पोलीस आयुक्त, वाहतुक, वरळी, मुंबई यांचे समक्ष हजर झालो. त्यांनी माझे कागदपत्रे पाहून मला कर्तव्यावर हजर करून घेतले.

माझा रुग्णनिवेदन कालावधी हा ४७६ दिवसाचा होता. त्यापैकी माझा दहा महिन्याचा पगार रोखण्यात आला होता. मी कर्तव्यावर हजर होवून बरेच दिवस झाल्यानंतर देखील माझा रोखलेला पगार मला मिळाला नाही. त्यामुळे सदर रोखण्यात आलेले वेतन लवकर मिळावे या हेतुने मी प्रशासकीय विभाग, वाहतुक शाखा, वरळी, मुंबई येथे माझे पगाराबाबत प्रत्यक्ष येवून चौकशी केली. त्यावेळी सदर कार्यालयात नेमणूकीस असलेले माझे मित्र श्री. पवार यांचेकडून माझ्या रोखलेल्या वेतनाचे काम सदर कार्यालयातील क्लार्क श्री. नडे यांचेकडे प्रलंबित असल्याचे मला समजले. त्यावेळी मी श्री. नडे यांची भेट घेतली असता श्री. नडे यांनी मला ''एक लाख रुपये दया, मी तुमचे सर्व काम करुन देतो'' असे सांगितले. श्री. नडे यांनी माझेकडे माझे रोखलेले वेतन पारित करण्याकरीता मागितलेली रक्कम ऐकुण मला खुप मानसिक ताण आला. परंतु मला रोखलेल्या पगाराची अंत्यत आवश्यकता असल्याने मी श्री. नडे यांनी मागणी केलेल्या लाचेची रक्कम देण्यास होकार दिला. त्यांनतर माझे रोखण्यात आलेले १० महिन्याचे वेतन हे पारित करण्यात आले. त्यामुळे मी श्री. नडे यांनी सांगितल्या प्रमाणे माझा मित्र श्री. पवार याच्या मार्फतीने रू. २०,०००/– इतकी रक्कम दिली. माझ्यावर यापुर्वी करण्यात आलेल्या औ षधोपचारावर प्रचंड खर्च झालेला असल्याने मला उर्वरित रक्कम रू. ८०,०००/– देण्यास विलंब होत होता. त्यामुळे मी कामानिमीत्त आमचे वरळी येथील वाहतुक मुख्यालयात आल्यावर श्री. नडे हे उर्वरित रक्कम कधी देणार अशी विचारणा केली, त्यावर मी त्यांना त्यांनी मागणी केलेली रक्कम जास्त होत असून काही रक्कम कमी करण्याबाबत विनंती केली. तेव्हा श्री. नडे यांनी ' **रुपये ७०,०००/– देवुन विषय संपवुन टाका, तुमचे**

Scanned with CamScanner

**सेवापुस्तक माझ्याकडे आहे. पैसे मिळाले नाही तर तुमची वसुली काढण्यात येईल '** असे बोलले. श्री. नडे यांच्या बोलण्यामुळे मला खुप मानसिक ताण व दडपण आले. तसेच मला इतकी मोठी रक्कम देणे शक्य नव्हते. तसेच वर नमुद प्रमाणे मागणी केलेली रक्कम रु. ७०,०००/— लाच स्वरुपात श्री. नडे यांना देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक ०२/०३/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे तक्रार करण्याचे ठरविले.

त्याप्रमाणे मी दिनांक ०२/०३/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे वरिष्ठ अधिकाऱ्यासमक्ष हजर राहिलो. त्यावेळी वरि ठांनी सांगितल्याप्रमाणे पो.नि. अमोल शिंदे यांचेकडे क्लार्क श्री. नडे यांचे विरुध्द स्व:हस्ताक्षरात मराठीमध्ये तक्रार लिहुन दिली. पो.नि. अमोल शिंदे यांनी माझी लेखी तक्रार घेवुन माझे तक्रार अर्जाची दोन ाासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल असे सांगुन त्वरीत दोन शासकीय पंचाना पाचारण केले. त्यानंतर पो.नि अमोल शिंदे हे मला पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षामध्ये घेवून गेले. तेथे डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पो.नि. अमोल शिंदे यांनी स्वत:चे, माझे व पंचांचे वक्तव्य रेकॉर्डींग केले.

त्यानंतर माझे सोबत पंच श्री. राजेश आंबेकर यांना लोकसेवक श्री. नडे यांचे वरळी येथील वाहतुक कार्यालय येथे पाठवून मी केलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. त्यानंतर स.पो.आ. देशमुख व पो.नि. अमोल शिंदे यांनी मला पडताळणी कारवाई बाबतच्या योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.नि. अमोल शिंदे, सपोआ देशमुख, पंच, पडताळणी पथक व मी हे सरकारी वाहनाने वरळी वाहतुक मुख्यालय जवळ जावुन थांबलो. तेथे पोनि शिंदे यांनी मला श्री नडे यांची भेट घेवुन सरळ पायी चालत लाप्रवि कार्यालयात येण्यास सांगितले. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, माझे शर्टाचे आतिल बनियनला लावला व माझे सोबत पंच श्री. आंबेकर यांना पाठविले. मी व पंच आंबेकर असे चालत सर पोचखानवाला रोडवर लोकसेवक श्री. नडे यांचे वाहतुक मुख्यालय, वरळी येथील कार्यालयात गेलो. सदर कार्यालयात श्री. नडे यांचेसह त्यांचे इतर सहकारी बसलेले होते. त्यावेळी मी श्री. नडे यांना खाली येता का? असे विचारले तेव्हा श्री. नडे माझेसह त्यांचे तिसऱ्या मजल्यावरील कार्यालयातून तळमजल्यावर इमारती बाहेर आले. तेथे मी श्री. नडे यांच्याशी त्यांनी मागणी केलेल्या लाचेच्या संदर्भात चर्चा केली व मागणी केलेली लाचेची रक्कम कमी करण्याबाबत विनंती केली. त्यावेळी श्री. नडे यांनी रू. ६०,०००/— आज देवून उर्वरीत रू. १०,०००/— पुढील महिन्यात देण्याबाबत सांगितले. त्यावेळी मी त्यांना आज दिनांक ०२/०३/२०२१ रोजी ते कार्यालयात किती वाजेपर्यंत असतील असे विचारले असता, त्यांनी ते सायंकाळी १८.१५ ते १८.३० वाजेपर्यंत उपस्थित आहेत असे सांगितले. त्यावर मी रू. ६०,०००/— इतकी रक्कम एटीएम मधुन काढून घेवून येतो असे सांगितले व मी आणि पंच श्री आंबेकर असे पायी चालत लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात परत आलो.

मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात आल्यावर पो.नि. अमोल शिंदे यांनी मला लावलेला व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद करून त्यांचे ताब्यात घेतला व पंच श्री जाधव यांनी पोनि शिंदे यांचे समक्ष माझ्याकडे आणि पंच श्री आंबेकर यांचेकडे लोकसेवक व माझे प्रत्यक्ष भेटीत झालेल्या संभाषणाबाबत चौकशी केली असता मी वरील नमुद प्रमाणे माहिती दिली.

त्यानंतर पो.नि. अमोल शिंदे व सपोआ देशमुख यांनी माझे व लोकसेवक नडे यांचे प्रत्यक्ष भेटी दरम्यान डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयातील पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षात पंचांसमक्ष वाजवून ऐकले.

मी दिनांक ०२/०३/२०२१ रोजी लोकसेवक श्री. नडे यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारी संदर्भात पडताळणी कारवाई दरम्यान लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने, दिनांक ०२/०३/२०२१ रोजी सापळापुर्व/सापळा कारवाई आयोजित करणार असल्याचे पो.नि. अमोल शिंदे यांनी मला सांगितले व लाचेची रक्कम सोबत आणली आहे काय? अशी विचारणा केली. त्यावेळी मी माझे अॅक्सिस बॅक खात्याच्या एटीएम मधून रु. ४०,०००/— व माझे बचतीमधील रू. २०,०००/ असे एकुण रू. ६०,०००/— (भारतीय चलनातील रु. ५००/— च्या १२० नोटा ) सोबत आणल्या असल्याचे पो.नि. अमोल शिंदे यांना सांगितले. सदर वेळी मी माझेकडील रक्कम रु. ६०,०००/— पो.नि. अमोल शिंदे यांचेकडे त्यांनी मागितल्यानुसार दिल्या त्यानंतर माझी पंचासमक्ष अंगझडती घेण्यात आली. माझे पॅन्टच्या उजव्या बाजुंचा खिसा वगळून इतर खिश्यामध्ये माझे अंगझडतीत मिळून आलेल्या वस्तु ठेवल्या. तद्नंतर पो.नि. अमोल शिंदे यांनी मी दिलेल्या सर्व नोटांचे पोनि शिंदे यांच्या प्रिंटरवर प्रती काढल्या. दरम्यान मला पंचासमक्ष अॅथ्रसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून अल्ट्रावायलेट लाईटचा वापर करून प्रत्याक्षिक करून दाखविले. तद्नंतर मी दिलेल्या नमुद नोटांच्या दोन्ही बाजूस अॅथ्रसिन पावडर लावून, सदर रक्कम एका खाकी लिफाफ्यात घालून सदर लिफाफ्याला बाहेरून अॅथ्रसिन पावडर लावून सदर लिफाफा माझे पॅन्टचे उजव्या बाजुच्या खिशात ठेवला. त्यानंतर

Scanned with CamScanner

सापळापुर्व/सापळा कारवाई दरम्यान करावयाचे कारवाई बाबत पो.नि. अमोल शिंदे यांनी मला व पंचांना तसेच सापळा पथकातील अंमलदारांना सुचना दिल्या व कारवाईचे आयोजन केले. तसेच लोकसेवक श्री. नडे यांनी वाहतुक कार्यालय, वरळी येथे लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर सापळा पथकातील सर्व अधिकारी व अंमलदार यांना दिसेल अशा पध्दतीने माझे हातातील पिवळसर रंगाची पिशवी जमीनीवर टाकण्याचा इशारा देणेबाबत सुचना दिली.

तद्नंतर पो.नि. अमोल शिंदे यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, माझे शर्टाचे आतिल बनियनला लावला त्यानंतर मी व पंच श्री. आंबेकर लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयातुन पायी चालत सर पोचखानवाला रोडवरून लोकसेवक श्री. नडे यांचे वाहतुक मुख्यालय,वरळी च्या प्रवेशव्दाराजवळ येथील फुटपाथवरील साईकृपा झेरॉक्स सेंटरच्या दुकानाच्या बाजुला जावून थांबलो. नंतर मी माझे मोबाईलवरून लोकसेवक श्री. नडे यांना त्यांचे मोबाईल फोनवर कॉल करून मी झेरॉक्सच्या दुकानाजवळ उभा असल्याचे सांगितले असता लोकसेवक श्री. नडे यांनी येतोच असे सांगितले. त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार व पंच हे कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने माझे पाठीमागे पायी चालत वर नमुद ठिकाणी आले व कोणासही संशय येणार नाही अशा पध्दतीने लांब उभे राहिले.

मी व पंच श्री. आंबेकर वाहतुक मुख्यालय, वरळी समोरील फुटपाथवरील साईकृपा झेरॉक्स सेंटरच्या दुकानाच्या शेजारी उभे असताना काही वेळात श्री. नडे हे त्यांचे मोटार सायकलवर आले. त्यांनी मोटार सायकल रस्त्यावर पार्क केली व माझ्या जवळ आले. त्यावेळी मी त्यांना माझे सोबत साठ हजार रूपये आणले असल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांनी सदर रक्कम स्वीकारण्याकरिता हात पुढे केला. मी सोबत आणलेली लाचेची रक्कम खाकी लिफाफ्यासह श्री. नडे यांना देवुन रक्कम मोजून घेण्यास सांगितले. त्यावेळी श्री. नडे हे ठिक आहे असे बोलले व त्यांनी लाचेची रक्कम उजव्या हाताने स्विकारून त्यांच्या नेसणीस असलेल्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवून दिली. त्यावेळी मी सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांना दिसेल अशा पध्दतीने माझ्या हातातील पिशवी खाली पाडून पुर्व नियोजीत इशारा केला. त्यावेळी तात्काळ पथकातील अंमलदारांनी पुढे येवून लोकसेवक श्री. नडे यांचे दोन्ही हात मनगटाजवळ घट्ट पकडून त्यांना जागीच अटकावून ठेवले.

त्यानंतर पो.नि. अमोल शिंदे यांनी मला बोलावून माझ्या शर्टाच्या आतील बनियनला लावलेला डिजीटल व्हाईस रेकार्डर काढून घेवून तो बंद करून स्वत:कडे ठेवला व सपोआ देशमुख, पो.नि. अमोल शिंदे यांनी लोकसेवक नडे यांना स्वत:ची ओळख सांगितली. त्यानंतर त्यांनी माझ्याकडे लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, सदर रक्कम लोकसेवक श्री. नडे यांनी त्यांचे नेसणीस असलेल्या पॅन्टच्या पुढील उजव्या खिशात ठेवली असल्याचे सांगितले. लोकसेवक श्री. नडे यांनी लाचेची मागणी केलेली रक्कम स्विकारली असल्याने नमूद पथकाने त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर मी,पंच, सपोआ देशमुख व पोलीस पथक एका शासकीय वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, वरळी येथे आलो.

तरी लोकसेवक श्री. सचिन नडे, वरिष्ठ लिपीक, रजा कक्ष, वाहतुक पोलीस मुख्यालय,वरळी, मुंबई यांनी माझे रोखण्यात आलेल्या १० महिन्याचे वेतन पारित करून केलेल्या कामाचा मोबदला म्हणून माझ्याकडे रू. १,००,०००/– इतकी लाचेची रक्कम मागुन दिनांक ०२/०३/२०२१ पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान तडजोडअंती रू. ६०,०००/– इतकी लाचेची रक्कम स्विकारण्याचे कबुल केले व दिनांक ०२/०३/२०२१ रोजीच पंचासमक्ष झालेल्या सापळा कारवाई दरम्यान सदर रक्कम स्विकारली म्हणून माझी लोकसेवक श्री. सचिन नडे यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.

माझा श्री. सचिन नडे यांचेशी कोणताही आर्थीक देवाण–घेवाणीचा व्यवहार किंवा त्यांचेशी कोणतेही वैमनस्य नाही.

माझा जवाब पो.नि. अमोल शिंदे यांनी संगणकावर मराठीत टंकलिखित केला असून, तो मी वाचून पाहिला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

03/03/2021

(अमोल शिंदे)
पोलीस निरिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

3/3/2021

Scanned with CamScanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ..........

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ..........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

सदरील नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आलोसे सचिन आत्माराम नडे, वरिष्ठ
लिपिक, [illegible], वांद्रे मुख्यालय मुंबई यांनी फिर्यादीचे वैद्यकीय रजेच्या
कालावधीतील पगार रोखल्याने आलेल्या १० महिन्याचे वेतन पारित करण्याकरिता
तसेच फिर्यादीचे [illegible] लाचेची मागणी केली. व सदर लाचेची
रक्कम [illegible] नंतर फिर्यादी यांचे [illegible] वेतनाची वसुली करण्यास
[illegible] फिर्यादी [illegible] फिर्यादीकडे पंचासमक्ष ५०,०००/- लाचेची
मागणी करून तडजोडीअंती रु ६०,०००/- लाच स्वीकारताना [illegible] प्रयत्न झालेने
याप्रकरणी [illegible] आलोसे सचिन नडे, वरिष्ठ लिपिक यांचे विरुद्ध कलम 7

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : श्री. पु. आणि [illegible] अन्वये गुन्हा नोंद असे

अमोल शिंदे. पो नि. ला. प्र. वि मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).......... Rank.......... No.......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.......... (3) Transferred to P. S. ..........
District.......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

3/3/2021

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. 03/03/2021
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ..........
पदनाम Rank अमोल शिंदे
तपासिक अं. चा कोड क्र. पोलीस निरीक्षक
Posting
Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner